# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

**प्रेसनोट** दिनांक:- १९/०३/२०१७

## इगतपुरीत हॉटेल मिस्टीक व्हॅली येथे स्थानिक गुन्हे शाखा व इगतपुरी पोलीसांचा छापा

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सा** यांचे आदेशान्वये जिल्हयातील अवैध धंदयांचे समुळ उच्चाटन होणेसाठी धडक कारवाई सुरू आहे. दिनांक २८/१०/२०१७ रोजी रात्रीचे सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी तसेच इगतपुरी पोलीसांनी मुंबई आग्रा महामार्गावरील तळेगाव, ता.इगतपुरी शिवारातील हॉटेल मिस्टीक व्हॅली येथे सुरू असलेल्या अवैध पार्टीवर अचानकपणे छापा टाकुन कारवाई केली आहे.

इगतपुरी तालुक्यातील तळेगाव शिवारात हॉटेल मिस्टीक व्हॅली येथे सुरू असलेल्या पार्टीबाबत मिळालेल्या माहितीवरुन **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांचे मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे अधिकारी व कर्मचारी तसेच इगतपुरी पोलीसांनी सदर ठिकाणावर छापा टाकला. हॉटेल मिस्टीक व्हॅलीतील एका बंगल्याममध्ये काही इसम तरूणींसह मद्यप्राशन करून डी.जे.च्या मोठया आवाजात आरडाओरड करून तोकडया कपडयांमध्ये बीभत्स नृत्य व अश्लिल हावभाव करतांना मिळुन आले. पोलीसांनी सदर ठिकाणावरून देशी-विदेशी दारू, डी.जे.साऊंड सिस्टीम असा मुद्देमाल जप्त केला असुन सदर छाप्यात इसम नामे **१) डॉ. राहुल मदनलाल जैन,** रा. बागमार भवन, रविवार पेठ नाशिक **२) अनिल लक्ष्मण बर्वे,** रा. देशपांडे वाडा, नाशिक **३) लक्ष्मण राजेंद्र पवार,** रा.पेठरोड नाशिक, **४) प्रकाश पांडुरंग गवळी,** रा. पंचवटी, नाशिक, **५) अर्जुन दत्तात्रय कवडे,** रा. मखमलाबाद, नाशिक, **६) बासुमोहन नाईक,** रा. खडकाळी नाशिक, **७) आकाश राजेंद्र गायकवाड,** रा.पाथर्डी फाटा, नाशिक **८) हर्षद विजयकुमार गोठी,** रा. पाथर्डी फाटा, नाशिक **९) चेतन दत्तात्रय कवरे,** रा.मखमलाबाद रोड, पंचवटी, नाशिक **१०) काशी आनंतलाल पंडीत,** रा. शिंगाडा तलाव, नाशिक अशांना घटनास्थळावरच ताब्यात घेण्यात आले. सदर ठिकाणावरून ०६ तरूणींची सुटका केली असुन ताब्यात घेतलेले इसमांविरुध्द **इगतपुरी पोलीस ठाणेस II गुन्हा रजि.नं. २६/२०१८** भादवि कलम २९४,३४ मुंबई पोलीस कायदा कलम ११२/११७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सा व अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड सा. यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, इगतपुरी पोस्टे पोलीस निरीक्षक श्री. राजेश शिंगटे, पोउनि स्वप्निल नाईक, सपोउनि नवनाथ गुरूळे, रविंद्र शिलावट, पोहवा रवि वानखेडे, पोकॉ संदिप हांडगे, सचिन पिंगळ तसेच इगतपुरी पो.स्टे.चे पोना गणेश वराडे, विनोद गोसावी, सचिन देसले, व दोन महिला पोलीस कर्मचारी अशा पथकाने सदर छापा टाकुन कारवाई केली आहे.